ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५


# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वार्षिक वर्गणी : ६ रु.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार तारीख १ मे, १९६३ | अंक ९



ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार तारीख १ मे, १९६३ | अंक ९



# विविध माहिती

**लाखेच्या उत्पादनांत घट होणार ?**—चालू वर्षी भारतामधील लाखेचें उत्पादन ५ लाख मण होईल, असा प्राथमिक अंदाज करण्यांत आला आहे. १९६२ सालीं ८,२०,००० मण आणि १९६१ सालीं ५,६०,००० मण लाखेचें उत्पादन झालें होतें. गेल्या १० वर्षांतील सरासरी उत्पादनाचा आंकडा ७,३१,००० मण आहे. सर्वांत अधिक उत्पादन बिहार राज्यांत होतें.

**आणखी अणुशक्तिचलित पाणबुड्या**—अमेरिकेची 'थ्रेशर' ही अणुशक्तिचलित पाणबुडी अटलांटिक महासागरांत बुडाली. ह्या बोटीवर असलेलीं १२९ माणसें दगावल्याचें जाहीर करण्यांत आलें आहे. येत्या कांहीं वर्षांत अमेरिका 'थ्रेशर'सारख्या आणखी २२ पाणबुड्या बांधणार आहे. नवीन पाणबुड्या अधिक खोल जाणाऱ्या व अधिक मजबूत बांधण्यांत येणार आहेत.

**कापडाच्या निर्यातींत स्पर्धा**— आग्नेय आशिआंतील ब्रह्मदेशासारख्या देशांतून चीन कापडाची निर्यात नेटानें करूं लागला आहे. त्याशिवाय युरोपच्या बाजारपेठांतूनहि चीनचें कापड स्पर्धा करूं लागलें आहे. चिनी कापड स्वस्त देण्यांत येत असल्यामुळें आग्नेय आशिआंत निर्यात होणाऱ्या भारताच्या कापडाला तीव्र स्पर्धेला तोंड द्यावें लागत आहे. ब्रह्मदेशांतील बँकांचें राष्ट्रीयीकरण झाल्यामुळें मात्र भारताच्या कापडाच्या निर्यातीवर कांहीं परिणाम झालेला नाहीं.

**रोग्यांची वेदना कमी करण्यासाठी**—शिकॅगो विद्यापीठाच्या वैद्यकीय संशोधकांनीं कॅन्सरसारख्या दुर्धर रोगांनीं पछाडलेल्या रोग्यांच्या वेदना सह्य करण्यासाठी एक उपाय शोधून काढला आहे. वेदनांची जाणीव देणाऱ्या नसांच्या केंद्रांत किरणोत्सारी सुई सुमारें १५ ते ३० मिनिटें टोंचून ठेवण्यांत येते. ह्या उपायानें रोग्यांची वेदना १ दिवसापासून २ आठवड्यांपर्यंत थांबवितां येते.

**लेनिनच्या भाषणाच्या ध्वनिमुद्रिका**— सोव्हिएट रशिआचा संस्थापक निकोलाय लेनिन ह्यानें १९१९ ते १९२२ च्या दरम्यान केलेल्या १० भाषणांच्या ध्वनिमुद्रिका, स्पष्टपणें ऐकूं येईल अशा तऱ्हेनें दुरुस्त करण्यांत आल्या आहेत. १९'९ सालीं लेनिनचीं ७ भाषणें असलेली ध्वनिमुद्रिका प्रसृत करण्यांत आली होती. परंतु चांगलें ऐकूं येण्याच्या दृष्टीनें ती अयशस्वी ठरली होती.

**दूर चित्रवाणीवर जंगली कलावंत**—भारत व जपान ह्यांच्या दरम्यान आठवड्यांतील तिसरी खेप 'एअर इंडिआ' कॉर्पोरेशननें सुरू केली आहे. ह्या प्रसंगानिमित्त टोकिओमधील दूर चित्रवाणीवर एक कार्यक्रम आयोजित करण्यांत आला. कार्यक्रमांत भाग घेण्यासाठी पांच महिन्यांचा एक चित्ता विमानानें टोकिओला नेण्यांत आला. नंतर हा चित्ता जपानी मुलांना देणगी म्हणून देण्यांत आला.

**गोव्यांतील भाडोत्री मोटारींची अडचण** — गोव्यांत सुमारें २,००० लोक भाड्याच्या मोटारींचा धंदा करतात. ह्या मोटारींत अनेक देशांतील मोटारी आहेत. मोटारींना लागणारे सुटे भाग मिळत नसल्यामुळें ह्या लोकांचा धंदा बंद पडण्याची वेळ आली आहे. जरूर ते सुटे भाग परदेशांतून आयात करण्यासाठी परवाने द्यावे अशी मागणी भारत सरकारकडे करण्यांत आली आहे.

**अन्नधान्याची आयात**—हिंद सरकारचे अन्नमंत्री श्री. स. का. पाटील मे महिन्यांत अमेरिकेला जाणार आहेत. अमेरिकेकडून अन्नधान्य आयात करण्याबद्दल सध्यां चालू असलेला करार १९६४ च्या जूनमध्यें संपणार आहे. अमेरिकेच्या पी. एल. ४८० कायद्याप्रमाणें अन्नधान्याच्या आयातीसंबंधीं नवीन करार करण्याची शक्यता श्री. पाटील अजमावणार आहेत.

**पिकांच्या विम्याचा कायदा**—भारतामधील प्रमुख पिकांचा विमा उतरविण्याची एक योजना तयार करण्यांत येत आहे. ह्यासाठी भारत सरकार स्वतंत्र कायदाच मंजूर करण्याची शक्यता आहे. कांहीं निवडक भागांत प्रथम एक अगर दोन प्रमुख पिकांचा विमा उतरविण्याची योजना प्रयोग म्हणून अमलांत आणण्यांत येईल.

**बुलढाणा येथें उद्यान**—बुलढाणा शहरांत एक मोठें उद्यान तयार करण्यांत येणार आहे. उद्यान २८ एकर जागेवर पसरलेलें असेल आणि त्यासाठी५९,०००रुपये खर्च येईल.त्यासंबंधींच्या प्राथमिक कामास सुरुवातहि करण्यांत आली आहे. उद्यानांत मुलांचा वेगळा विभाग स्थापन करण्यांत येणार आहे आणि विस्तृत हिरवळीहि तयार करण्यांत येणार आहेत.

**ब्रिटनच्या अणुशास्त्रज्ञाचा गौरव**—डॉ. ब्रुनो पाँटेकॉर्व्हो ह्या ब्रिटिश अणुशास्त्रज्ञाला रशिआनें लेनिन पारितोषिक बहाल केलें आहे. हा शास्त्रज्ञ १९५० सालीं आपल्या कुटुंबियांसह सुटीखातर इटलींत गेला असतां रहस्यपूर्णरीत्या नाहींसा झाला. पण नंतर तो रशिआला पळून गेल्याचें समजलें. डॉ. पाँटेकॉर्व्हो ज्यू असून आतां तो रशिआचा नागरिक झाला आहे. लेनिन पारितोषक मिळविणारा तो १९ वा शास्त्रज्ञ आहे.

**विधिमंडळांत पाणी पिण्यास मनाई**—बिहार विधिमंडळाचे एक कॉंग्रेस सभासद सर्वसाधारण कारभाराच्या अंदाजपत्रकावर बोलत असतां त्यांना तहान लागली. त्यांनीं शिपायाला पाणी आणण्यास सांगितलें. पण शिपाई पाणी घेऊन आल्यावर सभापतींनीं सभागृहांत पाणी पिण्यास मनाई केली. पाण्यास परवानगी दिल्यास मागून चहाचे कपहि येऊं लागतील असा खुलासा त्यांनीं केला. अखेर सभासदाला सभागृहाबाहेर जाऊन तृषा शांत करावी लागली.

**मदुरा येथें निर्जंतुक दुधाचा कारखाना**—संयुक्त राष्ट्र संघटनेची सांस्कृतिक व वैज्ञानिक शाखा आणि अन्न व शेतीसंघटना ह्यांच्या मदतीनें मदुरा येथें दूध निर्जंतुक करण्याचा कारखाना स्थापन करण्यांत येणार आहे. त्याच्या स्थापनेसाठी १·२ कोटी रुपये खर्च येईल. ह्या कारखान्यांत सुरुवातीला दररोज ५०,००० लिटर दुधावर संस्कार करण्यांत येईल; नंतर हळूहळू दुधाचें प्रमाण वाढवून रोज १,५०,००० लिटर दुधावर संस्कार करण्यांत येतील.

**गुजरात राज्यांत शस्त्रास्त्रांचा कारखाना**—गुजरातमधील कांहीं उद्योगपतींनीं देशांतील शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांचा दौरा केला होता. संरक्षण खात्याला लागणाऱ्या अनेक वस्तु गुजरातमध्यें तयार होऊं शकतात असें त्यांनीं खात्याला कळविलें होतें. त्याची फलनिष्पत्ति म्हणून गुजरात राज्यांत एक शस्त्रास्त्रांचा कारखाना काढण्याचा विचार करण्यांत येत आहे. बहुधा गुजरात राज्यांतील उधाना औद्योगिक वसाहतीजवळ सुरतनजीक कारखाना काढण्यांत येईल.

# अर्थ

बुधवार, ता. १ मे, १९६३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## भारतानें इतर प्रगत देशांना गांठलें पाहिजे

रिझर्व्ह बँकेचे भूतपूर्व गव्हर्नर आणि राष्ट्रीय उत्पादन मंडळाचे अध्यक्ष श्री. अय्यंगार ह्यांनीं भारताच्या औद्योगीकरणाविषयीं आपले विचार एका परिसंवादांत व्यक्त केले आहेत. उद्योगधंद्यांतील कारभाराचें शिक्षण घेण्यासाठी परदेशांत गेलेले ६० अधिकारी मद्रास येथील ह्या परिसंवादाला आले होते. त्यांच्यासमोर बोलतांना श्री. अय्यंगार म्हणाले कीं औद्योगिक उत्पादनाच्या बाबतींत भारतानें मोठी उडी घेऊन पुढील २५ वर्षांच्या काळांत प्रगत देशांना गांठलें पाहिजे. जपान व रशिआसारख्या देशांच्या औद्योगिक विकासाचा अभ्यास केला तर असें दिसतें कीं, १९५१ सालीं भारत ज्या औद्योगिक अवस्थेंत होता ती अवस्था त्यांनीं १९ व्या शतकाच्या अखेरीसच प्राप्त करून घेतलेली होती. पण, ह्याचा अर्थ भारतानें ह्या देशांच्या सतत ५० वर्षे मागें राहावें असा नाहीं. अमेरिका, रशिआ अगर जपान ह्या देशांनीं परदेशांतील उत्पादनतंत्राचा अभ्यास करण्यासाठी आपलीं माणसें परदेशीं पाठविलेलीं दिसत नाहींत. कारण त्या देशांतील औद्योगीकरणाबरोबरच तेथील उत्पादनतंत्राचाहि विकास होत गेला. औद्योगीकरणाला तांत्रिक प्रगल्भतेची जोड देण्यासाठी परदेशांत शिकून आलेल्या भारतीय तंत्रज्ञांनीं आपल्या अनुभवाचा फायदा शक्य तितक्या अधिक शिकाऊ लोकांना दिला पाहिजे. तांत्रिक ज्ञानाचा अशा रीतीनें प्रसार करण्यांत आल्यास औद्योगीकरणाची गति झपाट्यानें वाढेल ह्याविषयीं शंका बाळगण्याचें कारण नाहीं.

## अन्नपदार्थांच्या भेसळीचें चिंताजनक प्रमाण

गेल्या कांहीं वर्षांत अन्नपदार्थांच्या भेसळीचें प्रमाण वाढत चालल्याच्या तक्रारी हिंदमधील मोठमोठ्या शहरांतून ऐकू येऊं लागल्या. तथापि, तक्रारींत सत्याचा अंश किती ह्यासंबंधीं अधिकृत व खात्रीलायक माहिती मिळणें कठीण असे. दिल्ली म्युनिसिपल कॉर्पोरेशननें ह्या प्रश्नाची चर्चा करण्यासाठी अन्नपदार्थांची विक्री करणाऱ्या घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांची एक बैठक बोलाविली होती. कॉर्पोरेशननें स्वतः गेल्या वर्षी अनेक प्रकारच्या अन्नपदार्थांचे नमुने तपासले. ह्या तपासणींत असें आढळून आलें कीं तपासण्यांत आलेल्या पदार्थांपैकीं ३० टक्के पदार्थांत भेसळ करण्यांत आलेली होती. कॉर्पोरेशननें भरविलेल्या बैठकींत अन्नपदार्थांच्या भेसळीची आंकडेवारीच व्यापाऱ्यांना सादर करण्यांत आली. निरनिराळ्या पदार्थांमधील भेसळीचें प्रमाणहि चिंताजनक आढळून आलें. दुधाच्या व दह्याच्या पुरवठ्यापैकीं २५ टक्के पुरवठा आरोग्याला जरूर असणाऱ्या किमान दर्जापेक्षा कमी दर्जाचा होता. खाद्यतेलाच्या भेसळीचें प्रमाण गेल्या दोन वर्षांत १२ टक्क्यावरून १५ टक्क्यापर्यंत वाढलेलें आढळून आलें. अन्नपदार्थांत करण्यांत येणारी भेसळ थांबविण्यास पुरेशी यंत्रणा कॉर्पोरेशनजवळ नाहीं. अन्नपदार्थांचे पृथक्करण करण्यासाठी लागणाऱ्या प्रयोगशाळांची संख्या अवघी दोन आहे आणि त्यांच्या दर्जाची तपासणी करणारे नोकरहि पुरेसे नाहींत. आतां आणखी दोन प्रयोगशाळा स्थापन करण्यांत येणार असून तपासनिसांची संख्याहि वाढविली जाईल.

## हैद्राबादजवळील औषधाचा कारखाना

हैद्राबादजवळ सनत्‌नगर ह्या ठिकाणीं स्थापन करण्यांत येत असलेल्या औषधाच्या कारखान्याचें काम आतां जोरानें चालू झालें आहे. ह्या कारखान्यासाठी एकूण २० कोटी रुपये खर्च येणार असून औषधांच्या निर्मितीस १९६६ च्या प्रारंभीं सुरुवात होईल असा अंदाज आहे. कारखान्यासाठी लागणाऱ्या यंत्रसामग्रीपैकीं ३० टन वजनाची यंत्रसामग्री रशिआंतील ओडेसा बंदरांतून थेट विशाखापट्टम बंदरांत आणण्यांत आली व तेथून रेल्वेनें सनत्‌नगरला रवाना करण्यांत आली. ह्या यंत्रसामग्रीची किंमत सुमारें २६.६७ लाख रुपये आहे. कारखान्यासाठीं लागणारें साहित्य उतरवून घेण्यासाठी सनत्‌नगर येथें एक रेल्वेचा स्वतंत्र फाटाच नेण्यांत आला आहे. त्यासाठी १५ लाख रुपये खर्च करण्यांत आले. कारखान्याभोंवतीं एक नवीन शहरच उभारलें जात आहे. शहराच्या वसाहतीसाठी ८०० एकर जमिनीचा उपयोग करण्यांत येणार आहे. २० लाख रुपये खर्चून ३०० घरें बांधण्यांत आलीं आहेत. त्याशिवाय रशिअन तंत्रज्ञांना राहण्यासाठी ९ लाख रुपये खर्चून एक वसतिगृह बांधण्यांत आलें आहे. खुद्द कारखान्याच्या इमारतीसाठी २० हजार टन सिमेंट, ६ हजार टन पोलाद आणि १५ हजार टन पोलादाच्या नळ्या लागणार आहेत. कारखाना चालू झाल्यावर त्याला दररोज २५ ते ३० लाख गॅलन पाण्याचा पुरवठा करावा लागेल. पाणी पुरवठ्यासाठी ३.७५ कोटी रुपये खर्चाची योजना तयार करण्यांत आली आहे. कारखान्यांत दरसाल ९ कोटी रुपयांचीं औषधें तयार होतील.

## विशेष प्रकारच्या पोलादाचें उत्पादन

म्हैसूर आयर्न अँड स्टील वर्क्स आणि ऑस्ट्रिआंतील बोल्हर कंपनी ह्यांच्या दरम्यान तांत्रिक साह्याचा एक करार लवकरच करण्यांत येणार आहे. हा करार झाल्यावर भद्रावती येथील ह्या पोलादाच्या कारखान्याला विशेष प्रकारचे पोलाद निर्माण करण्याच्या प्रयत्नास सुरुवात करतां येईल. ह्या कामासाठी कारखान्याला १६ कोटी रुपये भांडवल लागेल. भद्रावती कारखान्यानें विशिष्ट प्रकारचे पोलाद उत्पन्न करण्यासाठी लागणारी प्राथमिक तयारी पुरी करीत आणली आहे. पश्चिम जर्मनींतील डिमॅग कंपनीनें नवीन उत्पादनयोजनेचा आराखडा दिलेला होता. त्यासंबंधीं कंपनीनें ऑस्ट्रिआंतील कंपनीचें सहकार्य घेतलेलें आहे. सध्याची आणीबाणीची परिस्थिति लक्षांत घेऊन भारत सरकारनें नव्या कारखान्याच्या उभारणीची त्वरा चालविली आहे. कारखान्यांत दरसाल ५०,००० टन विशेष प्रकारचें पोलाद निर्माण करण्यांत येईल.

# अर्थ

बुधवार, ता. १ मे, १९६३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारतानें इतर प्रगत देशांना गांठलें पाहिजे

रिझर्व्ह बँकेचे भूतपूर्व गव्हर्नर आणि राष्ट्रीय उत्पादन मंडळाचे अध्यक्ष श्री. अय्यंगार ह्यांनीं भारताच्या औद्योगीकरणाविषयीं आपले विचार एका परिसंवादांत व्यक्त केले आहेत. उद्योग-धंद्यांतील कारभाराचें शिक्षण घेण्यासाठीं परदेशांत गेलेले ६० अधिकारी मद्रास येथील ह्या परिसंवादाला आले होते. त्यांच्या-समोर बोलतांना श्री. अय्यंगार म्हणाले कीं औद्योगिक उत्पादना-च्या बाबतींत भारतानें मोठी उडी घेऊन पुढील २५ वर्षांच्या कालांत प्रगत देशांना गांठलें पाहिजे. जपान व रशिआसारख्या देशांच्या औद्योगिक विकासाचा अभ्यास केला तर असें दिसतें कीं, १९५१ सालीं भारत ज्या औद्योगिक अवस्थेंत होता ती अवस्था त्यांनीं १९ व्या शतकाच्या अखेरीसच प्राप्त करून घेत-लेली होती. पण, ह्याचा अर्थ भारतानें ह्या देशांच्या सतत ५० वर्षें मागें राहावें असा नाहीं. अमेरिका, रशिआ अगर जपान ह्या देशांनीं परदेशांतील उत्पादनतंत्राचा अभ्यास करण्यासाठीं आपलीं माणसें परदेशीं पाठविलेलीं दिसत नाहींत. कारण त्या देशांतील औद्योगिकरणाबरोबरच तेथील उत्पादनतंत्राचाहि विकास होत गेला. औद्योगीकरणाला तांत्रिक प्रगल्भतेची जोड देण्यासाठीं परदेशांत शिकून आलेल्या भारतीय तंत्रज्ञांनीं आपल्या अनुभवाचा फायदा शक्य तितक्या अधिक शिकाऊ लोकांना दिला पाहिजे. तांत्रिक ज्ञानाचा अशा रीतीनें प्रसार करण्यांत आल्यास औद्योगी-करणाची गति झपाट्यानें वाढेल ह्याविषयीं शंका बाळगण्याचें कारण नाहीं.

## अन्नपदार्थांच्या भेसळीचें चिंताजनक प्रमाण

गेल्या कांहीं वर्षांत अन्नपदार्थांच्या भेसळीचें प्रमाण वाढत चालल्याच्या तक्रारी हिंदमधील मोठमोठ्या शहरांतून ऐकू येऊ लागल्या. तथापि, तक्रारींत सत्याचा अंश किती ह्यासंबंधीं अधिकृत व खात्रीलायक माहिती मिळणें कठीण असे. दिल्ली म्युनिसिपल कॉर्पोरेशननें ह्या प्रश्नाची चर्चा करण्यासाठीं अन्न-पदार्थांची विक्री करणाऱ्या घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांची एक बैठक बोलाविली होती. कॉर्पोरेशननें स्वतः गेल्या वर्षी अनेक प्रकारच्या अन्नपदार्थांचे नमुने तपासले. ह्या तपासणींत असें आढळून आलें कीं तपासण्यांत आलेल्या पदार्थांपैकीं ३० टक्के पदार्थांत भेसळ करण्यांत आलेली होती. कॉर्पोरेशननें भरविलेल्या बैठकींत अन्नपदार्थांच्या भेसळीची आंकडेवारीच व्यापाऱ्यांना सादर करण्यांत आली. निरनिराळ्या पदार्थांमधील भेसळीचें प्रमाणहि चिंताजनक आढळून आलें. दुधाच्या व दह्याच्या पुरवठ्यापैकीं २५ टक्के पुरवठा आरोग्याला जरूर असणाऱ्या किमान दर्जापेक्षा कमी दर्जाचा होता. खायतेलाच्या भेसळीचें प्रमाण गेल्या दोन वर्षांत १२ टक्क्यावरून १५ टक्क्यापर्यंत वाढलेलें आढळून आलें. अन्नपदार्थांत करण्यांत येणारी भेसळ थांबविण्यास पुरेशी यंत्रणा कॉर्पोरेशनजवळ नाहीं. अन्नपदार्थांचे पृथक्करण करण्यासाठीं लागणाऱ्या प्रयोगशाळांची संख्या अवघी दोन आहे आणि त्यांच्या दर्जाची तपासणी करणारे नौकरहि पुरेसे नाहींत. आतां आणखी दोन प्रयोगशाळा स्थापन करण्यांत येणार असून तपासनिसांची संख्याहि वाढविली जाईल.

## हैदराबादजवळील औषधाचा कारखाना

हैदराबादजवळ सनत्नगर ह्या ठिकाणीं स्थापन करण्यांत येत असलेल्या औषधाच्या कारखान्याचें काम आतां जोरानें चालू झालें आहे. ह्या कारखान्यासाठीं एकूण २० कोटी रुपये खर्च येणार असून औषधांच्या निर्मितीस १९६६ च्या प्रारंभीं सुरुवात होईल असा अंदाज आहे. कारखान्यासाठीं लागणाऱ्या यंत्र-सामग्रीपैकीं ३० टन वजनाची यंत्रसामग्री रशिआंतील ओडेसा बंदरांतून थेट विशाखापट्टम बंदरांत आणण्यांत आली व तेथून रेल्वेनें सनत्नगरला रवाना करण्यांत आली. ह्या यंत्रसामग्रीची किंमत सुमारें २६·६७ लाख रुपये आहे. कारखान्यासाठीं लागणारें साहित्य उतरवून घेण्यासाठीं सनत्नगर येथें एक रेल्वेचा स्वतंत्र फाटाच नेण्यांत आला आहे. त्यासाठीं १५ लाख रुपये खर्च करण्यांत आले. कारखान्याभोंवतीं एक नवीन शहरच उभारलें जात आहे. शहराच्या वसाहतीसाठीं ८०० एकर जमिनीचा उपयोग करण्यांत येणार आहे. २० लाख रुपये खर्चून ३०० घरें बांधण्यांत आलीं आहेत. त्याशिवाय रशिअन तंत्रज्ञांना राहण्या-साठीं ९ लाख रुपये खर्चून एक वसतिगृह बांधण्यांत आलें आहे. खुद्द कारखान्याच्या इमारतीसाठीं २० हजार टन सिमेंट, ६ हजार टन पोलाद आणि १५ हजार टन पोलादाच्या नळ्या लागणार आहेत. कारखाना चालू झाल्यावर त्याला दररोज २५ ते ३० लाख गॅलन पाण्याचा पुरवठा करावा लागेल. पाणी पुरवठ्यासाठीं ३·७५ कोटी रुपये खर्चाची योजना तयार करण्यांत आली आहे. कारखान्यांत दरसाल ९ कोटी रुपयांचीं औषधें तयार होतील.

## विशेष प्रकारच्या पोलादाचें उत्पादन

म्हैसूर आयर्न अँड स्टील वर्क्स आणि ऑस्ट्रिआंतील बोल्हर कंपनी ह्यांच्या दरम्यान तांत्रिक साह्याचा एक करार लवकरच करण्यांत येणार आहे. हा करार झाल्यावर भद्रावती येथील ह्या पोलादाच्या कारखान्याला विशेष प्रकारचें पोलाद निर्माण करण्याच्या प्रयत्नास सुरुवात करतां येईल. ह्या कामासाठीं कार-खान्याला १६ कोटी रुपये भांडवल लागेल. भद्रावती कारखान्यानें विशिष्ट प्रकारचे पोलाद उत्पन्न करण्यासाठीं लागणारी प्राथमिक तयारी पुरी करीत आणली आहे. पश्चिम जर्मनींतील डिमॅग कंपनीनें नवीन उत्पादनयोजनेचा आराखडा दिलेला होता. त्यासंबंधीं कंपनीनें ऑस्ट्रिआंतील कंपनीचें सहकार्य घेतलेलें आहे. सध्याची आणीबाणीची परिस्थिति लक्षांत घेऊन भारत सरकारनें नव्या कारखान्याच्या उभारणीची त्वरा चालविली आहे. कारखान्यांत दरसाल ५०,००० टन विशेष प्रकारचें पोलाद निर्माण करण्यांत येईल.

### साखरकारखान्यांच्या जमिनी सरकारी मालकीच्या झाल्यावर ?

महाराष्ट्र अग्रि. लँड्स ( सीलिंग ऑन होल्डिंग्ज ) ॲक्ट, १९६१, च्या अन्वयें त्यांत निर्दिष्ट केलेली जमीन आपल्या ताब्यांत घेण्याचा अधिकार कलेक्टराला आहे. ह्या कायद्याप्रमाणें सरकारच्या ताब्यांत ऊस कारखान्यांच्या जमिनी जावयाच्या आहेत. त्यांच्या व्यवस्थेच्या हस्तांतराचा तपशील ठरविण्यासाठी महाराष्ट्र सरकारच्या मुख्य मंत्रांच्या अध्यक्षतेखाली साखर-कारखानदारांची एक सभा २१ ऑगस्ट, १९६२ रोजीं भरली होती. त्या सभेने ठरविल्याप्रमाणें सरकारनें सरकारी व निम-सरकारी सभासदांची एक सल्लागार समिति नेमली: त्यांत साखर-कारखान्यांचे प्रतिनिधीहि होते. सरकारनें त्या समितीचा सल्ला लक्षांत घेऊन जी पद्धति ठरविली, तिला मान्यता देण्यासाठी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटनें विशेष साधारण सभा बोलाविली आहे. संचालक मंडळानें ठरावाचा मसुदा तयार केला आहे. त्या अन्वयें सरकारच्या सूचनांना मान्यता देण्यांत आली आहे. सरकारी कंपनीला जरी लागवडीखालील जमीन दिली तर आजचा उभा ऊंस कंपनीनेंच गाळावयाचा आहे. जमिनीची मालकी सरकारी कंपनीनें स्वतःकडे घेतल्यावर पिकाबाबत सर्व जबाबदारी ऊस गाळीपर्यंत, त्या कंपनीवर राहील. त्यासाठी येणारा खर्च बृहन्महाराष्ट्र कंपनी देईल. बृहन्महाराष्ट्र कंपनी खंड, सारा, पाणीपट्टी, इतर सरकारी देणी देण्यास बांधलेली राहील. सरकारी कंपनीनें बृहन्महाराष्ट्र कंपनीला फार्मवरील सर्व ऊंस दिला पाहिजे. त्याची किंमत मध्यवर्ती सरकार ठरवून देईल. त्या दरानें सर्व ऊंस बृहन्महाराष्ट्र कंपनीनें घेतलाच पाहिजे.

---

### दि सांगली बॅंक लि.

दि सांगली बँक लि., सांगली ह्या बँकेस ३१ डिसेंबर १९६२ अखेर संपलेल्या वर्षी २,७४,५४९ रु. नफा झाला. ५६,००० रु. जनरल रिझर्व्हमध्यें घालून, १,२६,००० रु. ची करासाठी तरतूद करून, १०,००० रु. स्टाफ ग्रॅच्युइटी फंडाकडे वर्ग करून ५,००० रु. डिव्हिडंड ई. फंडांत टाकून आणि ५,००० सुवर्ण महोत्सवासाठी बाजूस काढून १५% करपात्र डिव्हिडंडसाठी ७३,५०३ रु. चा विनियोग करण्यांत आला. अहवालाचे वर्षी उघडलेल्या मांडवी ( मुंबई ) व बेळगांव शाखा धरून बँकेच्या आतां २२ शाखा झाल्या आहेत व त्या सर्वांचें कामकाज समाधानकारक चालू आहे. बँकेची वार्षिक सभा दि. २९ मार्च रोजीं झाली.

---

### दि साठे फौंडेशन ट्रस्ट

दि साठे फौंडेशन ट्रस्ट २० मार्च १९६३ रोजीं पब्लिक ट्रस्ट म्हणून रीतसर नोंदला गेला आहे. १ लक्ष रुपये जमा करण्याचें उद्दिष्ट एका वर्षाच्या आंतच पुरें झालें आहे.


महाराष्ट्रांतील सहकारी तत्त्वावर उभारणी केलेल्या साखर धंद्यांत अल्पकाळांत अग्रगण्य ठरलेला
व भारत सरकारच्या सहकारी तत्त्वप्रणीत औद्योगिक समृद्धि व सेवेसाठी सदैव तत्पर

## दि माळेगांव सहकारी साखर कारखाना लि.

तारेचा पत्ता : "कॉपशुगर" बारामती ] रजिस्टर नंबर जी–२६६ ]

माळेगांव बु० ( शिवनगर )

तालुका बारामती, जिल्हा पुणें.

[ टेलिफोन नंबर ५७, बारामती [ दिनांक २४–२–१९५५

शेतकऱ्यांची ही सहकारी संस्था यशस्वी करण्यासाठी ज्या लहान मोठ्या भागीदार, कामगार, अधिकारी व हितचिंतक यांनीं आपलें सर्वस्व अर्पिलें त्या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद !

—: कारखान्याची वाटचाल :—

| सन | उंस गळीत मे. टन | साखरनिर्मिति ( पोतीं ) | साखरेचा उतारा ( रिकव्हरी ) |
|---|---|---|---|
| १९५७–५८ | १,०४,६०५ | १,१७,९६२ | ११·६३ |
| १९५८–५९ | १,३०,३३३ | १,५७,७६१ | १२·४३ |
| १९५९–६० | १,३७,३६२ | १,६६,८४५ | १२·४६ |
| १९६०–६१ | १,६७,००७ | २,१०,१७१ | १२·५९ |
| १९६१–६२ | १,६६,४६१ | २,१३,२०५ | १२·८२ |
| १९६२–६३ चालू हंगाम दि. १७-४-६३ अखेर | १,६०,४८० | १,८३,५०० | १२·१४ |

—: संचालक मंडळ :—

१. श्री. वीरसिंह चंद्रसेन जाधवराव, चेअरमन. २. श्री. जयराम पांडुरंग सातव, व्हाइस चेअरमन. ३. श्री. रामचंद्र महादेव भोंगळे, ४. श्री. शंकरराव गणेश दाते, ५. उद्धवराव लक्ष्मणराव इंगुले, ६. श्री. गंगाधर व्यंकटराव तावरे, बी. एससी., ( ॲग्रि. ). ७. श्री. गुलाबराव साहेबराव ढवाण, ८. श्री. सुभेदार मारुतराव आटोळे, ९. श्री. शंकरराव साधुजी गोफणे, १०. दत्तात्रय पर्वती गावडे, ११. श्री. श्रीरंगराव कृष्णराव जगताप, १२. श्री. शिवलिंग संगमनाथ हिरेमठ, बी. एससी., एलएल्. बी., ( वकील ), १३. श्री. आर. एम्. देशमुख, बार–ॲट–लॉ ( एम. पी. ) इंड. फाय. कॉर्पोरेशनचे प्रतिनिधि. १४. श्री. बाबुलाल साहेबराव काकडे, पुणें सेंट्रल को–ऑप. बँकेचे प्रतिनिधि. १५. मेजर गुलाबराव बापूसाहेब देशमुख, मॅनेजिंग डायरेक्टर.

## कोलार येथील सोन्याच्या खाणी
### उत्पादन आणि त्याची किंमत

| वर्ष | | उत्पादन | | किंमत |
|---|---|---|---|---|
| | | टन | औंस | रुपये |
| १९४७ | ... | ५०८,२१७ | १७१,७८१ | ४,९२,४१,००० |
| १९४८ | ... | ५१९,५५४ | १८०,०८५ | ५,४५,५८,००० |
| १९४९ | ... | ४४९,१७४ | १६०,९९२ | ४,९२,६४,००० |
| १९५० | ... | ५७०,३४० | १८९,८२८ | ५,७४,८७,००० |
| १९५१ | ... | ६७०,५३० | २१६,४५० | ६,४३,३०,००० |
| १९५२ | ... | ७११,२०८ | २४३,६२९ | ५,७९,२६,००० |
| १९५३ | ... | ६१०,९९३ | २११,१२४ | ४,८३,३०,००० |
| १९५४ | ... | ६२९,४६६ | २२२,०२९ | ५,२३,७८,००० |
| १९५५ | ... | ५८६,७८७ | १९४,५४४ | ४,९०,४३,००० |
| १-१-१९५६ ते २८-११-१९५६ | | ६०२,७९९ | १७७,७१५ | ४,८९,२८,००० |
| २९-११-१९५६ ते ३१-३-१९५८ | | ८७६,९१२ | २१७,९३८ | ६,३१,३०,००० |
| १९५८/५९ | ... | ६३६,१८१ | १५०,७८१ | ४,५०,८९,००० |
| १९५९/६० | ... | ६४७,३६९ | १५३,४४२ | ५,११,३६,००० |

उत्पादनः—खनिज दररोज २,०२० टन
त्यांतील सोनें ,, ४७८ औंस

### मुलींच्या कोंडाळ्याला कंटाळला

कार्डिफ शहरांतील एका पोस्ट ऑफिसांत १८ वर्षांचा एक उमदा व देखणा तरुण हिशेबतपासनीस म्हणून काम करीत आहे. पण तेथें काम करण्याचा त्याला अगदीं कंटाळा आला आहे. कारण, त्याचे सहकारी म्हणजे १२० तरुणी आहेत. आपली बदली दुसरीकडे करण्यासाठी त्यानें कामगार-संघटनेकडे अर्ज केला आहे. त्याला तरुणींचा सहवास आवडत नाहीं असेंहि नाहीं. तो अजून अविवाहितच आहे. परंतु त्याला दिवसभर स्त्रियांची किलबिल आणि गालांत हंसणें ह्याला तोंड द्यावें लागतें. त्याचा बदली अर्ज नामंजूर झाला असल्यानें त्याला तेथेंच काम करावें लागत आहे.

### कच्च्या लोखंडाचा अपुरा पुरवठा

मध्यवर्ती सरकारच्या पोलाद व अवजड उद्योगधंद्याच्या खात्याचे मंत्री श्री. सुब्रह्मण्यम् ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, देशाच्या दक्षिण व पश्चिम भागांत सध्यां ओतकामाच्या कारखान्यांना लागणाऱ्या कच्च्या लोखंडाचा पुरवठा पुरेशा प्रमाणावर होऊं शकत नाहीं. सुमारें २० लाख टन अशुद्ध लोखंडाची मागणी आहे. परंतु त्यापैकीं अर्धीच मागणी भागवितां येत आहे. उपलब्ध होत असलेल्या साठ्यांतून संरक्षणविषयक व रेल्वेच्या मागण्यांना अग्रहक्क देण्यांत येत आहे. अशुद्ध लोखंडाचे देशांतील उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. परंतु सर्व मागणी अंतर्गत पुरवठ्यानें न भागल्यास रशिआकडून आयात करावी लागेल.

**कोळशाच्या खाणीची यंत्रसामग्री**—कोळशाच्या खाणींत वापरावयाची यंत्रसामग्री तयार करण्याचा कारखाना काढण्यासाठीं पोलंडची मदत घेण्यांत येणार आहे. भारताच्या कोळसा मंडळानें अशा प्रकारची ३०,००० टन वजनाची जादा यंत्रसामग्री तयार करण्यांत यावी अशी शिफारस केली आहे. कारखान्याचा दुपटीनें विस्तार करण्याची सोयहि करण्यांत येणार आहे.

### अमेरिकेच्या आर्थिक मदतीची पार्श्वभूमि

अमेरिकेपासून अगदीं नजीक असलेल्या क्यूबांत कम्युनिस्ट छापाची राजवट आल्यापासून दक्षिण अमेरिकेंतील देशांना आर्थिक मदत देऊन त्यांची आर्थिक प्रगति घडवून आणण्याचें महत्त्व अमेरिकन सरकारला अधिकच वाटूं लागलें आहे. दक्षिण अमेरिकेंत ब्राझिल हा देश सर्वांत मोठा असून त्याच्या सरहद्दी दोन सोडून सर्व दक्षिण अमेरिकेंतील देशांना लागलेल्या आहेत. त्यामुळें ब्राझिलमधील घडामोडींना भलतेंच वळण लागल्यास सर्व दक्षिण अमेरिका पेटण्याचा संभव आहे. ब्राझिलमध्यें दारिद्र्य भरपूर आहे. पण त्याचबरोबर संपत्ति निर्माण करण्याचीं अविकसित साधनेंहि भरपूर आहेत. म्हणून ब्राझिलला मोठ्या प्रमाणावर साह्य करण्यास अमेरिका तयार होत आहे.

### हिटलरच्या राजवटींतील आर्थिक तज्ज्ञ

हिटलरच्या राजवटींत आर्थिक व द्रव्यविषयक प्रश्न सोडविण्याबद्दल ख्यातनाम झालेले डॉ. शाक्ट ३१ मार्च रोजी त्यांनीं स्वतःच स्थापन केलेल्या बँकिंगच्या संस्थेतून सेवानिवृत्त झाले. ही संस्था त्यांनीं १० वर्षांपूर्वीं स्थापन केलेली आहे. आतां त्यांचे वय ८६ वर्षांचे आहे. हिटलरची राजवट दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस कोसळल्यावर त्यांच्यावर युद्ध गुन्हेगार म्हणून खटला भरण्यांत आला होता. त्यानंतर १९४८ सालीं पश्चिम जर्मनीच्या सरकारनेंहि नाझींना साह्य करणारे म्हणून त्यांना कोर्टांत खेचलें होतें. परंतु दोन्ही प्रसंगांतून ते निर्दोष सुटले होते.

**मरहूम जिनांच्या थडग्यासाठीं संगमरवर**—कराची येथें पाकिस्तानचे निर्माते मरहूम जिना ह्यांचें स्मारक बांधण्यांत येत आहे. स्मारकासाठीं प्रथम राजस्थानमधील संगमरवरी दगड वापरण्यांत यावयाचा होता; पण तो फारसा टिकाऊ नसल्यामुळें दुसऱ्या संगमरवराचा शोध करण्यांत येत आहे. राजस्थानांतील संगमरवराचा उपयोग ताजमहाल बांधण्यासाठीं केला आहे असें म्हणतात.

## इंडियन बँक्स असोसिएशन

### नवे पदाधिकारी

श्री. तुलसीदास किलाचंद ( दि बँक ऑफ बरोडा लि. ), श्री. टी. डी. कनसारा ( दि बँक ऑफ इंडिया लि. ) आणि श्री. सी. ई. कामथ ( दि कॅनरा बँक लि. ) ह्यांची अनुक्रमें चेअरमन, डेप्युटी चेअरमन व ऑनररी सेक्रेटरी म्हणून फेर निवड झाली. कमिटीचे इतर सभासद खालीलप्रमाणें आहेत. श्री. एम. एम. चोकसी ( दि बँक ऑफ बरोडा लि. ), श्री. एम. के. करंजिया ( दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. ), श्री. कमलनयन बजाज ( दि पंजाब नॅशनल बँक लि. ), श्री. एम. आर. रुइया ( दि युनायटेड कमर्शिअल बँक लि. ) श्री. प्रवीणचंद्र व्ही. गांधी ( दि देवकरण नानजी बँकिंग कं. लि. ), श्री. संजीवन बानर्जी ( दि युनायटेड बँक ऑफ इंडिया लि. ), श्री. सी. व्ही. जोग ( दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. ), श्री. एस. व्ही. सुंदरम् ( दि इंडियन ओव्हरसीज् बँक लि. ), श्री. के. एल. व्ही. नायक ( दि कॅनरा इंडस्ट्रिअल अँड बँकिंग सिंडिकेट लि. ) आणि श्री. आर. वाय. गर्ग ( दि बँक ऑफ राजस्थान लि. )

### असोसिएशनच्या सभासद-बँका

एकूण ६७ हिंदी शेड्यूल्ड बँकांपैकी ४० बँका असोसिएशनच्या सभासद आहेत. स्टेट बँक ऑफ इंडिया वगळून' सर्व मोठ्या शेड्यूल्ड बँका, मध्यम आकाराच्या सर्व बँका आणि लहान आकाराच्या बँकांपैकी बहुसंख्य बँका ह्यांचा त्यांत समावेश होतो. असोसिएशनच्या सभासद नसलेल्या बिगर-शेड्यूल्ड बँकांची संख्या २०० चेवर आहे. एक्सचेंज बँक्सच्या असोसिएशन्सचें कार्य स्वतंत्रपणें चालूच आहे. २१ स्टेट को. बँका आहेत आणि ५०० सेंट्रल को. बँका आहेत. ह्या सर्व बँका इंडियन बँक्स असोसिएशनच्या कक्षेंत आल्या म्हणजे ती असोसिएशन खरी प्रातिनिधिक होईल.

---

### बहुसंख्य भागधारक असणाऱ्या मोठ्या २० कंपन्या

| कंपनी | भागधारकांची संख्या |
|---|---|
| १ टाटा आयर्न अँड स्टील | ७,००० |
| २ असोसिएटेड सिमेंट | ४४,००० |
| ३ सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन | ३९,४०० |
| ४ सिंथेटिक्स अँड केमिकल्स | २५,००० ते ३०,००० |
| ५ फिलिप्स कार्बन ब्लॅक | |
| ६ बरोडा रेयॉन कॉर्पोरेशन | |
| ७ अहमदाबाद इलेक्ट्रिसिटी | २०,००० ते २५,००० |
| ८ सेंट्रल बँक | |
| ९ प्रीमिअर ऑटोमोबाइल्स | १५,००० ते २०,००० |
| १० बर्मा शेल रिफायनरीज (डिबेंचर्स) | |
| ११ जे. के. कॉटन | |
| १२ इंडिया युनायटेड मिल्स | |
| १३ टाटा इंजिनिअरिंग अँड लोकोमोटिव्ह | १०,००० ते १५,००० |
| १४ हिंदुस्थान लिव्हर | |
| १५ सेंट्रल बँक | |
| १६ न्यू इंडिया अॅशुअरन्स | |
| १७ टाटा केमिकल्स | |
| १८ आयझॅक होल्डन्स ( इंडिया ) | |
| १९ टाटा पॉवर सप्लाय | |
| २० बँक ऑफ इंडिया | |

---

दूरध्वनि : २२४८३. तार : सेंको बँक

**पुणें सेंट्रल**

**को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें**

लक्ष्मी पथ–पुणें शहर.

व्याजाचे नवीन आकर्षक दर–

चालू ठेव ... ... १/४ टक्के
सेव्हिंग्ज ... ... २ टक्के

कायम ठेव–

१ महिना ... ... ३·३७ टक्के
३ महिने ... ... ३·५० टक्के
६ महिने ... ... ३·७५ टक्के
१ वर्ष ... ... ४ टक्के
२ वर्षे ... ... ४·२५ टक्के
३ वर्षांचे वर ... ... ४·५० टक्के

याशिवाय भक्कम सुरक्षित ठेवघरें.

*आमच्या बँकेच्या कोणत्याहि शाखेस भेट द्या.*
*सर्व माहिती आनंदानें पुरवूं.*

डी. बी. तांबट
कार्यकारी संचालक.

---

**बेळगांव बँक लिमिटेड मध्यें आपल्या बचतीची वाढ होऊं द्या.**

होम सेव्हिंग्ज ठेवींवर ३ (तीन) %
५ वर्षांच्या मुदती ठेवींवर ५½ ( साडेपांच ) % पर्यंत
३ वर्षांच्या कॅश सर्टिफिकिटावर ४½ ( साडेचार ) %
५ वर्षांच्या कॅश सर्टिफिकिटावर ५ (पांच) %
५ वर्षांच्या क्युम्युलेटिव्ह ठेवींवर ४½ ( साडेचार ) %

आकर्षक अटींवर कॉल आणि शॉर्ट टर्म ठेवी स्वीकारल्या जातात.

**दि बेळगांव बँक लिमिटेड**

स्थापना : १९३० ] [ शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस आणि रजिस्टर्ड ऑफिस
रविवार पेठ, बेळगांव, म्हैसूर राज्य

*म्हैसूर आणि महाराष्ट्र राज्यात एकूण १८ शाखा.*

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

हुबळी आणि मुधोळ ( म्हैसूर राज्य ) येथें लवकरच शाखा उघडण्यांत येतील.

## कोलार येथील सोन्याच्या खाणी

### उत्पादन आणि त्याची किंमत

| वर्ष | उत्पादन | | किंमत |
|---|---|---|---|
| | टन | औंस | रुपये |
| १९४७ ... | ५०८,२१७ | १७१,७८१ | ४,९२,४१,००० |
| १९४८ ... | ५१९,५५४ | १८०,०८५ | ५,४५,५८,००० |
| १९४९ ... | ४४९,१७४ | १६०,९९२ | ४,९२,६४,००० |
| १९५० ... | ५७०,३४० | १८९,८२८ | ५,७४,८७,००० |
| १९५१ ... | ६७०,५३० | २१६,४५० | ६,४३,३०,००० |
| १९५२ ... | ७११,२०८ | २४३,६२९ | ५,७९,२६,००० |
| १९५३ ... | ६१०,९९३ | २११,१२४ | ४,८३,३०,००० |
| १९५४ ... | ६२९,४६६ | २२२,०२९ | ५,२३,७८,००० |
| १९५५ ... | ५८६,७८७ | १९४,५४४ | ४,९०,४३,००० |
| १-१-१९५६ ते २८-११-१९५६ | ६०२,७९९ | १७७,७१५ | ४,८९,२८,००० |
| २९-११-१९५६ ते ३१-३-१९५८ | ८७६,९१२ | २१७,९३८ | ६,३१,३०,००० |
| १९५८/५९ ... | ६३६,१८१ | १५०,७८१ | ४,५०,८१,००० |
| १९५९/६० ... | ६४७,२६९ | १५३,४४२ | ५,११,३६,००० |

उत्पादनः—खनिज दररोज २,०२० टन
त्यांतील सोनें ,, ४७८ औंस

### मुलींच्या कोंडाळयाला कंटाळला

कार्डिफ शहरांतील एका पोस्ट ऑफिसांत १८ वर्षांचा एक उमदा व देखणा तरुण हिशेबतपासनीस म्हणून काम करीत आहे. पण तेथें काम करण्याचा त्याला अगदीं कंटाळा आला आहे. कारण, त्याचे सहकारी म्हणजे १२० तरुणी आहेत. आपली बदली दुसरीकडे करण्यासाठी त्यानें कामगार-संघटनेकडे अर्ज केला आहे. त्याला तरुणींचा सहवास आवडत नाहीं असेंहि नाहीं. तो अजून अविवाहितच आहे. परंतु त्याला दिवसभर स्त्रियांची किलबिल आणि गालांत हंसणें ह्याला तोंड द्यावें लागतें. त्याचा बदली अर्ज नामंजूर झाला असल्यानें त्याला तेथेंच काम करावें लागत आहे.

### कच्च्या लोखंडाचा अपुरा पुरवठा

मध्यवर्ती सरकारच्या पोलाद व अवजड उद्योगधंद्याच्या खात्याचे मंत्री श्री. सुब्रह्मण्यम् ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, देशाच्या दक्षिण व पश्चिम भागांत सध्यां ओतकामाच्या कारखान्यांना लागणाऱ्या कच्च्या लोखंडाचा पुरवठा पुरेशा प्रमाणावर होऊं शकत नाहीं. सुमारें २० लाख टन अशुद्ध लोखंडाची मागणी आहे. परंतु त्यापैकी अर्धीच मागणी भागवितां येत आहे. उपलब्ध होत असलेल्या साठ्यांतून संरक्षणविषयक व रेल्वेच्या मागण्यांना अग्रहक्क देण्यांत येत आहे. अशुद्ध लोखंडाचे देशांतील उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. परंतु सर्व मागणी अंतर्गत पुरवठ्यानें न भागल्यास रशिआकडून आयात करावी लागेल.

**कोळशाच्या खाणींची यंत्रसामग्री**—कोळशाच्या खाणींत वापरावयाची यंत्रसामग्री तयार करण्याचा कारखाना काढण्यासाठी पोलंडची मदत घेण्यांत येणार आहे. भारताच्या कोळसा मंडळानें अशा प्रकारची ३०,००० टन वजनाची जादा यंत्रसामग्री तयार करण्यांत यावी अशी शिफारस केली आहे. कारखान्याचा दुपटीनें विस्तार करण्याची सोयहि करण्यांत येणार आहे.

### अमेरिकेच्या आर्थिक मदतीची पार्श्वभूमि

अमेरिकेपासून अगदीं नजीक असलेल्या क्यूबांत कम्युनिस्ट छापाची राजवट आल्यापासून दक्षिण अमेरिकेंतील देशांना आर्थिक मदत देऊन त्यांची आर्थिक प्रगति घडवून आणण्याचें महत्त्व अमेरिकन सरकारला अधिकच वाटूं लागलें आहे. दक्षिण अमेरिकेंत ब्राझिल हा देश सर्वांत मोठा असून त्याच्या सरहद्दी दोन सोडून सर्व दक्षिण अमेरिकेंतील देशांना लागलेल्या आहेत. त्यामुळें ब्राझिलमधील घडामोडींना भलतेंच वळण लागल्यास सर्व दक्षिण अमेरिका पेटण्याचा संभव आहे. ब्राझिलमध्यें दारिद्र्य भरपूर आहे. पण त्याचबरोबर संपत्ति निर्माण करण्याचीं अविकसित साधनेंहि भरपूर आहेत. म्हणून ब्राझिलला मोठ्या प्रमाणावर साह्य करण्यास अमेरिका तयार होत आहे.

### हिटलरच्या राजवटींतील आर्थिक तज्ज्ञ

हिटलरच्या राजवटींत आर्थिक व द्रव्यविषयक प्रश्न सोडविण्याबद्दल ख्यातनाम झालेले डॉ. शाक्ट ३१ मार्च रोजी त्यांनीं स्वतःच स्थापन केलेल्या बँकिंगच्या संस्थेंतून सेवानिवृत्त झाले. ही संस्था त्यांनीं १० वर्षांपूर्वी स्थापन केलेली आहे. आतां त्यांचे वय ८६ वर्षांचे आहे. हिटलरची राजवट दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस कोसळल्यावर त्यांच्यावर युद्ध गुन्हेगार म्हणून खटला भरण्यांत आला होता. त्यानंतर १९४८ सालीं पश्चिम जर्मनीच्या सरकारनेंहि नाझींना साह्य करणारे म्हणून त्यांना कोर्टांत खेचले होते. परंतु दोन्ही प्रसंगांतून ते निर्दोष सुटले होते.

**मरहूम जिनांच्या थडग्यासाठी संगमरवर**—कराची येथें पाकिस्तानचे निर्माते मरहूम जिना ह्यांचें स्मारक बांधण्यांत येत आहे. स्मारकासाठी प्रथम राजस्थानमधील संगमरवरी दगड वापरण्यांत यावयाचा होता; पण तो फारसा टिकाऊ नसल्यामुळें दुसऱ्या संगमरवराचा शोध करण्यांत येत आहे. राजस्थानांतील संगमरवराचा उपयोग ताजमहाल बांधण्यासाठी केला आहे असें म्हणतात.

## इंडियन बँक्स असोसिएशन

### नवे पदाधिकारी

श्री. तुलसीदास किलाचंद ( दि बँक ऑफ बरोडा लि. ), श्री. टी. डी. कनसारा ( दि बँक ऑफ इंडिया लि. ) आणि श्री. सी. ई. कामथ ( दि कॅनरा बँक लि. ) ह्यांची अनुक्रमें चेअरमन, डेप्युटी चेअरमन व ऑनररी सेक्रेटरी म्हणून फेर निवड झाली. कमिटीचे इतर सभासद खालीलप्रमाणें आहेत. श्री. एम. एम. चोकसी ( दि बँक ऑफ बरोडा लि. ), श्री. एम. के. करंजिया ( दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. ), श्री. कमलनयन बजाज ( दि पंजाब नॅशनल बँक लि. ), श्री. एम. आर. रुइया ( दि युनायटेड कमर्शिअल बँक लि. ) श्री. प्रवीणचंद्र व्ही. गांधी ( दि देवकरण नानजी बँकिंग कं. लि. ), श्री. संजीवन बानर्जी ( दि युनायटेड बँक ऑफ इंडिया लि. ), श्री सी. व्ही. जोग ( दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. ), श्री. एस. व्ही. सुंदरम् ( दि इंडियन ओव्हरसीज् बँक लि. ), श्री. के. एल. व्ही. नायक ( दि कॅनरा इंडस्ट्रिअल अँड बँकिंग सिंडिकेट लि. ) आणि श्री. आर. वाय. गर्ग ( दि बँक ऑफ राजस्थान लि. )

### असोसिएशनच्या सभासद-बँका

एकूण ६७ हिंदी शेड्यूल्ड बँकांपैकी ४० बँका असोसिएशनच्या सभासद आहेत. स्टेट बँक ऑफ इंडिया वगळून सर्व मोठ्या शेड्यूल्ड बँका, मध्यम आकाराच्या सर्व बँका आणि लहान आकाराच्या बँकांपैकी बहुसंख्य बँका ह्यांचा त्यांत समावेश होतो. असोसिएशनच्या सभासद नसलेल्या बिगर-शेड्यूल्ड बँकांची संख्या २०० चेवर आहे. एक्सचेंज बँक्सच्या असोसिएशन्सचें कार्य स्वतंत्रपणें चालूच आहे. २१ स्टेट को. बँका आहेत आणि ५०० सेंट्रल को. बँका आहेत. ह्या सर्व बँका इंडियन बँक्स असोसिएशनच्या कक्षेंत आल्या म्हणजे ती असोसिएशन खरी प्रातिनिधिक होईल.

---

### बहुसंख्य भागधारक असणाऱ्या मोठ्या २० कंपन्या

| कंपनी | भागधारकांची संख्या |
|---|---|
| १ टाटा आयर्न अँड स्टील | ७,००० |
| २ असोसिएटेड सिमेंट | ४४,००० |
| ३ सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन | ३९,४०० |
| ४ सिंथेटिक्स अँड केमिकल्स<br>५ फिलिप्स कार्बन ब्लॅक<br>६ बरोडा रेयॉन कॉर्पोरेशन | २५,००० ते ३०,००० |
| ७ अहमदाबाद इलेक्ट्रिसिटी<br>८ सेंट्रल बँक | २०,००० ते २५,००० |
| ९ प्रीमिअर ऑटोमोबाइल्स<br>१० बर्मा शेल रिफायनरीज (डिबेंचर्स)<br>११ जे. के. कॉटन<br>१२ इंडिया युनायटेड मिल्स | १५,००० ते २०,००० |
| १३ टाटा इंजिनिअरिंग अँड लोकोमोटिव्ह<br>१४ हिंदुस्थान लिव्हर<br>१५ सेंट्रल बँक<br>१६ न्यू इंडिया अॅशुअरन्स<br>१७ टाटा केमिकल्स<br>१८ आयझॅक होल्डन्स ( इंडिया )<br>१९ टाटा पॉवर सप्लाय<br>२० बँक ऑफ इंडिया | १०,००० ते १५,००० |

---


दूरध्वनि : २२४८३. तार : सेंको बँक

# पुणें सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें

लक्ष्मी पथ–पुणें शहर.

व्याजाचे नवीन आकर्षक दर–

| | | | |
|---|---|---|---|
| चालू ठेव | ... | ... | १/४ टक्के |
| सेव्हिंग्ज | ... | ... | ३ टक्के |
| **कायम ठेव–** | | | |
| १ महिना | ... | ... | ३·३७ टक्के |
| ३ महिने | ... | ... | ३·५० टक्के |
| ६ महिने | ... | ... | ३·७५ टक्के |
| १ वर्ष | ... | ... | ४ टक्के |
| २ वर्षें | ... | ... | ४·२५ टक्के |
| ३ वर्षांचे वर | ... | ... | ४·५० टक्के |

याशिवाय भक्कम सुरक्षित ठेवघरें.

*आमच्या बँकेच्या कोणत्याहि शाखेस भेट द्या. सर्व माहिती आनंदानें पुरवूं.*

डी. बी. तांबट
कार्यकारी संचालक.



## बेळगांव बँक लिमिटेड मध्यें आपल्या बचतींची वाढ होऊं द्या.

होम सेव्हिंग्ज ठेवींवर ३ ( तीन ) %

५ वर्षांच्या मुदती ठेवींवर ५½ ( साडेपांच ) % पर्यंत

३ वर्षांच्या कॅश सर्टिफिकिटावर ४½ ( साडेचार ) %

५ वर्षांच्या कॅश सर्टिफिकिटावर ५ ( पांच ) %

५ वर्षांच्या क्युम्युलेटिव्ह ठेवींवर ४½ ( साडेचार ) %

आकर्षक अटींवर कॉल आणि शॉर्ट टर्म ठेवी स्वीकारल्या जातात.

# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना : १९३० ] [ शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस आणि रजिस्टर्ड ऑफिस

रविवार पेठ, बेळगांव, म्हैसूर राज्य

*म्हैसूर आणि महाराष्ट्र राज्यात एकूण १८ शाखा.*

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

हुबळी आणि मुधोळ ( म्हैसूर राज्य ) येथें लवकरच शाखा उघडण्यांत येतील.

## जादा आलेले हजार रु. बँकेला परत दिले

सोलापूर येथील एक हातमाग कारखानदार श्री. दशरथ विठोबा बुर्गूल यांचेकडे जमा झालेले श्री. आर. एन. जितुरी (लुगड्यांचे व्यापारी) यांचे २७०० रु. चे दोन चेक्स, श्री. बुर्गूल यांचे मित्र श्री. हणमंतु मादास हे महाराष्ट्र बँक फलटण गल्ली शाखेंत वटविण्यासाठी गेले असतां कॅशियरकडून त्या दोन्ही चेक्सची रक्कम घेऊन ते परत गेले. दुकानांत आल्यानंतर वटविलेल्या चेक्सची रक्कम एक हजाराने जास्त असल्याचे श्री. बुर्गूल यांचे निदर्शनास आले.

श्री. बुर्गूल हे त्वरित महाराष्ट्र बँकेच्या फलटण गल्लीमधील शाखेत गेले व तेथील एजंटाला ते भेटले, आणि वरील घडलेला प्रकार त्यांचे निदर्शनास आणला व जास्त आलेले हजार रुपये परत केले. बँकेच्या एजंटने कृतज्ञता व्यक्त केली.

## छोट्या शस्त्रास्त्रांचा कारखाना

डोंगराळ भागांतील लढाईत उपयोगी पडतील अशा प्रकारचीं शस्त्रास्त्रें भारताला देण्याचें रशिआनें कबूल केलें आहे. अशा प्रकारच्या छोट्या शस्त्रास्त्रांचा कारखाना काढण्यासाठी मदत देण्याचीहि तयारी रशिआनें दाखविली आहे. भारताचे रशिआंतील राजदूत श्री. टी. एन्. कौल कोणत्या प्रकारच्या शस्त्रास्त्रांची भारताला जरूर आहे ह्यासंबंधीं रशियन सरकारच्या अधिकाऱ्यांशीं चर्चा करणार आहेत.

## व्यापारी पारिभाषिक शब्दकोश *

महाराष्ट्रीय तरुणांचीं व्यवसायक्षितिजें विस्तारत आहेत आणि विद्यापीठांतून मराठी माध्यमाची मागणी वाढत आहे. व्यापार–उद्योग क्षेत्रांत मराठी भाषिक मागासलेलें असल्यामुळें तद्विषयक मराठी शब्दांचा भरणा अगदीं तोकडा आहे. इंग्रजी शब्दांना समानार्थी मराठी शब्द मिळत नाहींत; ते नव्यानें तयारच करावे लागतात. हे विषय मराठींतून शिकवितांना वाटणारी गरज दूर व्हावी ह्या दृष्टीनें आचार्य भोपटकरांनीं प्रस्तुत शब्दकोश रचिला आहे. २,५३४ इंग्रजी शब्दांना मराठी प्रतिशब्द दिले असून अखेरीस १९५ संक्षिप्त शब्दहि दिले आहेत. अर्थबोध नीट व्हावा, ह्या दृष्टीनें जरूर तेथें व जरूर तेवढी माहिती दिली आहे. व्यापाराचा अनुभव नसणारांना ही माहिती विशेष उपयुक्त वाटेल. सुप्रसिद्ध इंग्रजी कोशांचा आदर्श पुढें ठेवूनच प्रा. भोपटकरांनीं हा शब्दकोश अतिशय मेहनत घेऊन तयार केला आहे.

व्यापारी शिक्षण–क्षेत्रांतील त्यांची प्रदीर्घ तपश्चर्या आणि प्रत्यक्ष आर्थिक व्यवहारांचा अनुभव ह्यांस तळमळीची जोड असल्यामुळें प्रस्तुत शब्दकोश आदर्श झाला आहे. व्यापारी आणि औद्योगिक प्रगतीबरोबर नवे नवे शब्द रूढ होऊं लागतील आणि व्यापारी शब्दसंख्या वाढत जाईल, हें उघड आहे. प्रा. भोपटकरांचें प्रस्तुत कार्य ह्या क्षेत्रांत सतत मार्गदर्शन करीत राहील. ह्या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी भारत सरकारनें देणगी दिली आहे, ह्याचा उल्लेख करणें आवश्यक आहे. गेल्या दोन वर्षांतील प्रकृतीच्या अस्वास्थ्यावरहि मात करून प्रा. भोपटकरांनीं शब्दकोशाचें काम उत्कृष्ट रीतीनें तडीस नेलें आहे; त्यांच्या ध्येयवादामुळेंच तें शक्य झालें आहे. या शब्दकोशाचा उपयोग व्यापारी विद्यालयांप्रमाणें बँकांसारख्या संस्थांतून व्यापक प्रमाणावर केला जाईल, अशी अपेक्षा आहे.

* संपादक व लेखक : गणेश कृष्ण भोपटकर एफ. सी. आय. संस्थापक व माजी प्राचार्य, डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स, पृष्ठ सं. १७५ किं. रु. ६

## जपानी कंपन्यांच्या मदतीनें पोलादाचा कारखाना

हिंदच्या हिंदुस्थान स्टील कॉर्पोरेशनने ६ जपानी पोलादाच्या कंपन्यांच्या एका गटाकडे कांहीं खास प्रकारच्या पोलादाच्या कारखान्याला लागणाऱ्या यंत्रसामग्रीची मागणी नोंदविली आहे. ह्या कारखान्यासाठी कॉर्पोरेशनने ब्रिटन, फ्रान्स, कॅनडा, पश्चिम जर्मनी इत्यादि देशांतील पोलाद–कंपन्यांकडेहि विचारणा केली होती. एकूण ३५ कंपन्यांनीं टेंडर्स पाठविलीं होतीं. परंतु त्यांच्याशीं स्पर्धा करून जपानी कंपन्यांनीं हें काम मिळविलें. संकल्पित कारखाना पश्चिम बंगालमध्यें काढण्यांत यावयाचा असून त्यासाठी ४ कोटी डॉलर्स खर्च येणार आहे. जपाननें परदेशी निर्यात केलेला हा सर्वांत मोठा पोलादाचा कारखाना असेल. कारखान्यांत दरसाल ८०,००० टन पोलाद निर्माण करण्यात येईल.

## निसर्गोपचार पद्धति म्हणजे छांदिष्टपणा नाहीं


गांधी स्मारक निधीच्या निसर्गोपचार समितीनें निसर्गोपचार पद्धतीसंबंधीं हैद्राबाद येथें एक परिसंवाद भरविला होता. परिसंवादाला ४० प्रतिनिधि उपस्थित होते. परिसंवादांत बोलतांना नियोजन समितीचे एक सभासद श्रीमन्नारायण म्हणाले कीं, निसर्गोपचार पद्धति म्हणजे छांदिष्टपणाचा एक प्रकार आहे असें सरकारचें मत नाहीं. तें एक शास्त्र असून त्याला उत्तेजन देणें आवश्यक आहे. ह्या उपचारपद्धतीचा प्रचार व प्रसार करणाऱ्या संस्थांना व संघटनांना आता अधिक मोठ्या प्रमाणांत आर्थिक साह्य देण्याचा विचार चालू आहे.

## गुजराती चित्रपटव्यवसायाला उत्तेजन

गुजराती चित्रपटांच्या निर्मितीला उत्तेजन देण्यासाठी गुजरात राज्य सरकारने कांही उपाय योजण्याचे ठरविलें आहे. गुजराती निर्मात्यांशीं ह्यासंबंधीं बोलणीं करण्यासाठी लवकरच त्यांना निमंत्रणें देण्यांत येणार आहेत. ज्या चित्रपटांची दोन तृतीयांश निर्मिति गुजरातमध्ये करण्यांत येईल. त्यांना सवलती देण्याचा व खास बाक्षिसें देण्याचा विचार करण्यांत येत आहे. सरकार चित्रपटांचें संरक्षण करणारी एक संस्थाहि काढणार आहे.

## ब्रिटनची पहिली अणुशक्तीची पाणबुडी

व्हीकर्स आर्मस्टाँग कंपनीच्या बोटींच्या कारखान्यानें बांधलेली ब्रिटनची पहिली अणुशक्तिचलित पाणबुडी नुकतीच समुद्रांत सोडण्यांत आली. ह्या बोटीचें वजन ३,००० टन असून ती बांधण्यासाठी २ कोटी पौंड खर्च आला. बोटीवर अद्ययावत् पद्धतीचे पाण्यांतील बाण आहेत. साध्या पाणबुडीपेक्षा तीव्र अधिक क्षेपणास्त्रें ठेवण्याची सोय आहे.

PUMPS 1" TO 3" & FOOT-VALVES.
NEW VIJAY INDUSTRIES LTD.
VISHRAMBAG, SANGLI. (S. SATARA)

### जास्त आलेले हजार रु. बँकेला परत दिले

सोलापूर येथील एक हातमाग कारखानदार श्री. दशरथ विठोबा बुर्गूल यांचेकडे जमा झालेले श्री. आर. एन. जितुरी (लुगड्यांचे व्यापारी) यांचे २७०० रु. चे दोन चेक्स, श्री. बुर्गूल यांचे मित्र श्री. हणमंतु मादास हे महाराष्ट्र बँक फलटण गल्ली शाखेत वटविण्यासाठी गेले असतां कॅशियरकडून त्या दोन्ही चेक्सची रक्कम घेऊन ते परत गेले. दुकानांत आल्यानंतर वटविलेल्या चेक्सची रक्कम एक हजाराने जास्त असल्याचे श्री. बुर्गूल यांचे निदर्शनास आले.

श्री. बुर्गूल हे त्वरित महाराष्ट्र बँकेच्या फलटण गल्लीमधील शाखेत गेले व तेथील एजंटाला ते भेटले, आणि वरील घडलेला प्रकार त्यांचे निदर्शनास आणला व जास्त आलेले हजार रुपये परत केले. बँकेच्या एजंटने कृतज्ञता व्यक्त केली.

### छोट्या शस्त्रास्त्रांचा कारखाना

डोंगराळ भागांतील लढाईत उपयोगी पडतील अशा प्रकारचीं शस्त्रास्त्रें भारताला देण्याचें रशिआनें कबूल केलें आहे. अशा प्रकारच्या छोट्या शस्त्रास्त्रांचा कारखाना काढण्यासाठी मदत देण्याचीहि तयारी रशिआनें दाखविली आहे. भारताचे रशिआंतील राजदूत श्री. टी. एन्. कौल कोणत्या प्रकारच्या शस्त्रास्त्रांची भारताला जरूर आहे ह्यासंबंधीं रशियन सरकारच्या अधिकाऱ्यांशीं चर्चा करणार आहेत.

### व्यापारी पारिभाषिक शब्दकोश *

महाराष्ट्रीय तरुणांचीं व्यवसायक्षितिजें विस्तारत आहेत आणि विद्यापीठांतून मराठी माध्यमाची मागणी वाढत आहे. व्यापार–उद्योग क्षेत्रांत मराठी भाषिक मागासलेलें असल्यामुळें तद्विषयक मराठी शब्दांचा भरणा अगदीं तोकडा आहे. इंग्रजी शब्दांना समानार्थी मराठी शब्द मिळत नाहींत; ते नव्यानें तयारच करावे लागतात. हे विषय मराठींतून शिकवितांना वाटणारी गरज दूर व्हावी ह्या दृष्टीनें आचार्य भोपटकरांनीं प्रस्तुत शब्दकोश रचिला आहे. २,५३४ इंग्रजी शब्दांना मराठी प्रतिशब्द दिले असून अखेरीस १९५ संक्षिप्त शब्दहि दिले आहेत. अर्थबोध नीट व्हावा, ह्या दृष्टीनें जरूर तेथें व जरूर तेवढी माहिती दिली आहे. व्यापाराचा अनुभव नसणारांना ही माहिती विशेष उपयुक्त वाटेल. सुप्रसिद्ध इंग्रजी कोशांचा आदर्श पुढें ठेवूनच प्रा. भोपटकरांनीं हा शब्दकोश अतिशय मेहनत घेऊन तयार केला आहे.

व्यापारी शिक्षण–क्षेत्रांतील त्यांची प्रदीर्घ तपश्चर्या आणि प्रत्यक्ष आर्थिक व्यवहारांचा अनुभव ह्यांस तळमळीची जोड असल्यामुळें प्रस्तुत शब्दकोश आदर्श झाला आहे. व्यापारी आणि औद्योगिक प्रगतीबरोबर नवे नवे शब्द रूढ होऊं लागतील आणि व्यापारी शब्दसंख्या वाढत जाईल, हें उघड आहे. प्रा. भोपटकरांचें प्रस्तुत कार्य ह्या क्षेत्रांत सतत मार्गदर्शन करीत राहील. ह्या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी भारत सरकारनें देणगी दिली आहे, ह्याचा उल्लेख करणें आवश्यक आहे. गेल्या दोन वर्षांतील प्रकृतीच्या अस्वास्थावरहि मात करून प्रा. भोपटकरांनीं शब्दकोशाचें काम उत्कृष्ट रीतीनें तडीस नेलें आहे; त्यांच्या ध्येयवादामुळेंच तें शक्य झालें आहे. या शब्दकोशाचा उपयोग व्यापारी विद्यालयांप्रमाणें बँकांसारख्या संस्थांतून व्यापक प्रमाणावर केला जाईल, अशी अपेक्षा आहे.

* संपादक व लेखक : गणेश कृष्ण भोपटकर एफ. सी. आय. संस्थापक व माजी प्राचार्य, डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स, पृष्ठ सं. १७५ किं. रु. ६

### जपानी कंपन्यांच्या मदतीनें पोलादाचा कारखाना

हिंदच्या हिंदुस्थान स्टील कॉर्पोरेशनने ६ जपानी पोलादाच्या कंपन्यांच्या एका गटाकडे कांहीं खास प्रकारच्या पोलादाच्या कारखान्याला लागणाऱ्या यंत्रसामग्रीची मागणी नोंदविली आहे. ह्या कारखान्यासाठी कॉर्पोरेशनने ब्रिटन, फ्रान्स, कॅनडा, पश्चिम जर्मनी इत्यादि देशांतील पोलाद–कंपन्यांकडेहि विचारणा केली होती. एकूण ३५ कंपन्यांनीं टेंडर्स पाठविलीं होतीं. परंतु त्यांच्याशीं स्पर्धा करून जपानी कंपन्यांनीं हें काम मिळविलें. संकल्पित कारखाना पश्चिम बंगालमध्यें काढण्यांत यावयाचा असून त्यासाठी ४ कोटी डॉलर्स खर्च येणार आहे. जपाननें परदेशी निर्यात केलेला हा सर्वांत मोठा पोलादाचा कारखाना असेल. कारखान्यांत दरसाल ८०,००० टन पोलाद निर्माण करण्यात येईल.

### निसर्गोपचार पद्धति म्हणजे छांदिष्टपणा नाहीं


गांधी स्मारक निधीच्या निसर्गोपचार समितीनें निसर्गोपचार पद्धतीसंबंधीं हैदराबाद येथें एक परिसंवाद भरविला होता. परिसंवादाला ४० प्रतिनिधि उपस्थित होते. परिसंवादांत बोलतांना नियोजन समितीचे एक सभासद श्रीमन्नारायण म्हणाले कीं, निसर्गोपचार पद्धति म्हणजे छांदिष्टपणाचा एक प्रकार आहे असें सरकारचें मत नाहीं. तें एक शास्त्र असून त्याला उत्तेजन देणें आवश्यक आहे. ह्या उपचारपद्धतीचा प्रचार व प्रसार करणाऱ्या संस्थांना व संघटनांना आता अधिक मोठ्या प्रमाणांत आर्थिक साह्य देण्याचा विचार चालू आहे.

### गुजराती चित्रपटव्यवसायाला उत्तेजन

गुजराती चित्रपटांच्या निर्मितीला उत्तेजन देण्यासाठी गुजरात राज्य सरकारने कांही उपाय योजण्याचे ठरविलें आहे. गुजराती निर्मात्यांशीं ह्यासंबंधीं बोलणीं करण्यासाठी लवकरच त्यांना निमंत्रणें देण्यांत येणार आहेत. ज्या चित्रपटांची दोन तृतीयांश निर्मिति गुजरातमध्ये करण्यांत येईल. त्यांना सवलती देण्याचा व खास बक्षिसें देण्याचा विचार करण्यांत येत आहे. सरकार चित्रपटांचें संरक्षण करणारी एक संस्थाहि काढणार आहे.

### ब्रिटनची पाहिली अणुशक्तीची पाणबुडी

व्हीकर्स आर्मस्टॅांग कंपनीच्या बोटींच्या कारखान्यानें बांधलेली ब्रिटनची पहिली अणुशक्तिचलित पाणबुडी नुकतीच समुद्रांत सोडण्यांत आली. ह्या बोटीचें वजन ३,००० टन असून ती बांधण्यासाठी २ कोटी पौंड खर्च आला. बोटीवर अद्ययावत् पद्धतीचे पाण्यांतील बाण आहेत. साध्या पाणबुडीपेक्षा तीवर अधिक क्षेपणास्त्रें ठेवण्याची सोय आहे.




॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २.

**अर्जुना झुंझ देखे आतांचें । हें हो का जें दैव तुमचें ।**
**कीं निधान सकळ धर्मांचें । प्रगटलें असें ॥** —श्रीज्ञानेश्वरी

*स्वामी विवेकानंदांनीं म्हटल्याप्रमाणें आज आपल्याला उपासना हवी आहे. सिंहगर्जनेनें गीतेचा उद्घोष करणाऱ्या श्रीकृष्णाची, कोदंडपाणी रामाची, महावीर हनुमंताची, जगदंबा कालीची, या उपासनेनेंच अदम्य इच्छाशक्ति व प्रचंड उत्साह यांनीं प्रेरित होऊन आपले देशबांधव कामाला लागतील.*

**महाराष्ट्र राज्याच्या तृतीय वर्धापन-दिनानिमित्त राज्याचें अभीष्टचिंतन व आमच्या भागीदार, ठेवीदार व हितचिंतकांना अभिवादन.**

***********


**आक्रमकाचा प्रतिकार करण्याचा निर्धार आपण आज पुन्हा निष्ठेनें व्यक्त करूं या. अंतीं विजय आपलाच आहे.**

—: संचालक मंडळ :—

श्री. शं. ल. लिमये, B. SC., LL. B., वकील, अध्यक्ष.

श्री. भ. ग. भाडुले, B. SC., LL. B. वकील
श्री. रामराव देशमुख, M. A., LL. B. (cant.) Bar-at-law, M. P.
श्री. वि. कृ. साठे, बी. ए. (टिळक), माजी पुरवठा मंत्री, मुंबई राज्य.
श्री. ग. ह. सबनीस
श्री. श्री. र. केसकर, वकील
श्री. ज. चं. आगाशे
श्री. गो. न. जोशी, B. SC.
श्री. रा. ह. केळकर, B. COM., F. C. A.

श्री. गो. श्री. वाळिंबे, B. COM., ऑफिशिएटिंग मॅनेजर.





॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २.

**अर्जुना झुंझ देखे आतांचें। हें हो का जें दैव तुमचें।**
**कीं निधान सकळ धर्माचें। प्रगटलें असें ॥** —श्रीज्ञानेश्वरी

*स्वामी विवेकानंदांनीं म्हटल्याप्रमाणें आज आपल्याला उपासना हवी आहे. सिंहगर्जनेनें गीतेचा उद्घोष करणाऱ्या श्रीकृष्णाची, कोदंडपाणी रामाची, महावीर हनुमंताची, जगदंबा कालीची, या उपासनेनेंच अदम्य इच्छाशक्ति व प्रचंड उत्साह यांनी प्रेरित होऊन आपले देशबांधव कामाला लागतील.*

**महाराष्ट्र राज्याच्या तृतीय वर्धापन-दिनानिमित्त राज्याचें अभीष्टचिंतन व आमच्या भागीदार, ठेवीदार व हितचिंतकांना अभिवादन.**

************

**आक्रमकाचा प्रतिकार करण्याचा निर्धार आपण आज पुन्हा निष्ठेनें व्यक्त करूं या. अंतीं विजय आपलाच आहे.**

—: संचालक मंडळ :—

श्री. शं. ल. लिमये, B. Sc., LL. B., वकील, अध्यक्ष.

श्री. भ. ग. भाडुले, B. Sc., LL. B. वकील
श्री. रामराव देशमुख, M. A., LL. B. (Cant.) Bar-at-law, M. P.
श्री. वि. कृ. साठे, बी. ए. (टिळक), माजी पुरवठा मंत्री, मुंबई राज्य.
श्री. ग. ह. सवनीस
श्री. श्री. र. केसकर, वकील
श्री. ज. चं. आगाशे
श्री. गो. न. जोशी, B. Sc.
श्री. रा. ह. केळकर, B. Com., F. C. A.

श्री. गो. श्री. वाळिंबे, B. Com., ऑफिशिएटिंग मॅनेजर.

## राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांचें भांडवल

ता. २३ फेब्रुआरी, १९६३ ह्या दिवशीं ब्रह्मदेशाच्या सरकारनें तेथील बँकांचें राष्ट्रीयीकरण केलें. एकूण २४ बँका सरकारनें आपल्या ताब्यांत घेतल्या. त्यांपैकीं १४ परदेशीय होत्या आणि १० स्थानिक म्हणजे ब्रह्मदेशांतीलच होत्या. राष्ट्रीयीकरण करण्यांत आलेल्या १४ परदेशीय बँकांपैकीं १२ बँकांना त्यांचें मूळचें भांडवल त्यांच्या त्यांच्या मायदेशींच्या मुख्य कचेरीकडे वर्ग करण्याची परवानगी ब्रह्मदेशाच्या सरकारनें दिली आहे. सरकारच्या वतीनें बँकिंग बिझिनेस नॅशनलायझेशन कमिटीनें हा निर्णय जाहीर केला आहे. सेंट्रल बँक ऑफ इंडिया आणि स्टेट बँक ऑफ इंडिया ह्यांच्या हिशेबांचा व मालमत्तेचा बदला मात्र अजून भारत सरकारच्या नांवावर करण्यांत आलेला नाहीं. ह्या बँकांच्या व्यवहारांचे हिशेब बदला करण्यांत आल्यावर त्यांच्याहि भांडवलाची परत पाठवणी मंजूर करण्यांत येईल. राष्ट्रीयीकरण कमिटीनें ह्यासंबंधीं एक माहितीपत्रक काढलें आहे. त्यांतील माहिती राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांच्या मॅनेजरांकडूनच आलेली आहे. ह्या माहितीप्रमाणें १४ परदेशीय बँकांपैकीं ११ बँकांनीं प्रत्येकी ५ लाख रुपयांचें भांडवल ब्रह्मदेशांत आणलें होतें. ह्या बँका अशा आहेत : चार्टर्ड बँक, हबीब बँक, इंडिअन ओव्हरसीज बँक, युनायटेड कमर्शिअल बँक, पंजाब नॅशनल बँक, हाँगकाँग अँड शांघाय बँकिंग कॉर्पोरेशन, नॅशनल अँड ग्रिंडलेज बँक, कम्युनिकेशन्स बँक, पीपल्स बँक ऑफ चायना, नेदरलँडस ट्रेडिंग असोसिएशन व ओव्हरसीज चायनीज बँक. मर्कंटाइल बँकेनें फक्त २,३३,३३३ रुपये भांडवल आणलें होतें.

## एंजिनिअरिंगच्या मालाला परदेशीय बाजारपेठ

भारताच्या एंजिनिअरिंग एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलचें एक प्रतिनिधिमंडळ नुकताच युरोपचा दौरा करून परत आलें आहे. ह्या मंडळानें एंजिनिअरिंगच्या मालाला पश्चिम युरोपीय देशांत बाजारपेठ मिळविणें कितपत शक्य आहे ह्या प्रश्नाचा अभ्यास करून असा अभिप्राय व्यक्त केला आहे, की एंजिनिअरिंगच्या मालाला औद्योगिक दृष्ट्या प्रगत असलेल्या देशांत सुद्धां बराच वाव आहे. भारताच्या औद्योगिक प्रगतीविषयीं प्रगत देशांनाहि अद्याप असावी तशी कल्पना नाहीं. त्यामुळें तेथील, पुष्कळ धंदेवाल्यांना भारताकडून कच्चा माल आणि मसाल्याचे पदार्थ एवढाच माल मिळूं शकतो असें वाटतें. एंजिनिअरिंगचा माल भारताकडून मिळतो हें त्यांना खरेंच वाटत नाहीं. प्रगत औद्योगिक देशांना सुद्धां कांहीं एंजिनिअरिंगचा माल परदेशाकडून मिळाल्यास तो हवा असतो. कारण, ह्या आयातीमुळें त्यांच्या साधन-सामग्रीचा त्यांना अधिक चांगला उपयोग करता येणें शक्य होतें. रशिया, पश्चिम जर्मनी, अमेरिका, ह्यासारखे प्रगतीच्या आघाडीवर असणारे देशहि वजनानें हलका असलेला अनेक प्रकारचा एंजिनिअरिंगचा माल परदेशांतून आयात करतात. प्रतिनिधिमंडळानें अशी सूचना केली आहे कीं, प्रगत देशांना लागणारा एंजिनिअरिंगचा माल तयार करण्याकरतां सरकार व खाजगी कारखानदार ह्यांनीं मिळून संयुक्त कारखाने काढावेत. अशा प्रकारच्या निर्यातीसाठीच काढण्यांत आलेल्या कारखान्याला भरपूर काम मिळूं शकेल आणि त्यामुळें परदेशीय चलनाची प्राप्तिहि होईल.


**: प्रगतीचा आणखी एक टप्पा :**

**पणजी व मडगांव-गोवा येथें बँकेच्या शाखा १ मे रोजीं सुरू होत आहेत.**

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

पुणें-२.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | : | रु. ५० लाखांचे वर |
| गंगाजळी | : | रु. २६ लाखांचे वर |
| खेळतें भांडवल | : | रु. २५ कोटींचे वर |

व्याजाचे दर :

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | : | ३ टक्के |
| मुदत ठेव १ ते ५ वर्षें | : | ४॥ टक्के ते ५॥ टक्के |

★ महाराष्ट्र ★ म्हैसूर ★ आंध्र व ★ मध्यप्रदेश यांमध्यें एकूण ८१ शाखा.
विदेशविनिमयासुद्धां बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

चिं. वि. जोग
जनरल मॅनेजर

### लँड सीलिंग ॲक्ट बेकायदा ठरवून मागणारा अर्ज

गंगापूर शुगर मिल्स लि. नें मुंबई हायकोर्टाकडे अर्ज करून लँड सीलिंगचा कायदा बेकायदा ठरवून मागितला आहे. कंपनीनें ४१७२ एकर जमीन गंगापूर तालुक्यांत खरेदी केली, पण सीलिंगच्या कायद्याप्रमाणें ती स्वतःकडे आतां फक्त ९६ एकरच जमीन ठेवूं शकते. कायद्याची अमलबजावणी स्थगित करण्याचा हायकोर्टानें हुकूम केला आहे.

### वनस्पतिशास्त्रज्ञाचें पुस्तक

भारतामधील रशिअन वकिलातींत काम करणाऱ्या एका वनस्पतिशास्त्रज्ञानें भारतांत व नेपाळांत मिळून ५०,००० किलोमीटर प्रवास करून एक पुस्तक लिहिलें आहे. सदर पुस्तकाची पहिली आवृत्ति एका आठवड्यांतच संपली. रशिआंतील वनस्पति संशोधन संस्थेसाठी त्यानें कांहीं उपयुक्त बीं-बियाणें बरोबर नेलीं आहेत.


### रूरकेला पोलाद कारखान्याचा विस्तार


रूरकेला येथील पोलादाच्या कारखान्याचा विस्तार करण्यासाठी पश्चिम जर्मनीकडून ४८ कोटी रुपयांची मदत घेण्याचा करार करण्यांत आला आहे. ह्या कारखान्याची वार्षिक उत्पादन-क्षमता सध्यां १० लाख टनांची आहे. विस्ताराची योजना पूर्ण झाल्यावर दरसाल १८ लाख टन पोलाद निर्माण होऊं लागेल.

### साठे कंपनीची परदेशी हुंडणावळीची कमाई

मार्च, १९६३ अखेर संपलेल्या वर्षी साठे बिस्किट अँड चॉकोलेट कं. लि. नें ऑस्ट्रेलिया आणि ग्रेट ब्रिटनकडे ३०.४३२ टन कोकोबटरची निर्गत केली आणि १२ टन बिस्किटें मध्य पूर्वेतील देशांकडे निर्गत केली. अशा रीतीनें २,०४,२६४ रु. ची परदेशी हुंडणावळ कमावली.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★





किर्लोस्कर
१" केन्ही टाइप
सेल्फ प्रायमिंग पंपिंग सेट
घरगुती उपयोगासाठीं तळ मजल्यावरुन वरच्या मजल्यावर पाणी नेण्यासाठीं किर्लोस्कर एक अिंचि पंप अत्यंत उपयुक्त व किफायतशीर आहेत. हे पंप दोन व तीन स्टेजमध्यें तयार केले जात असून त्यांस अनुक्रमे पाऊण व एक हॉ.पॉ.ची मोटर लागते. जास्तीतजास्त १०५ फूट उंचीवर या पंपाकडून १२० गॅलन्स पाणी दर तासास मिळू शकते.
किर्लोस्कर ब्रदर्स, लि. किर्लोस्करवाडी, जि. सांगली.
STUSA KM 2/62

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.

### लँड सीलिंग ॲक्ट बेकायदा ठरवून मागणारा अर्ज

गंगापूर शुगर मिल्स लि. नें मुंबई हायकोर्टाकडे अर्ज करून लँड सीलिंगचा कायदा बेकायदा ठरवून मागितला आहे. कंपनीनें ४१७२ एकर जमीन गंगापूर तालुक्यांत खरेदी केली, पण सीलिंगच्या कायद्याप्रमाणें ती स्वतःकडे आतां फक्त ९६ एकरच जमीन ठेवूं शकते. कायद्याची अमलबजावणी स्थगित करण्याचा हायकोर्टानें हुकूम केला आहे.

---

### वनस्पतिशास्त्रज्ञाचें पुस्तक

भारतामधील रशिअन वकिलातींत काम करणाऱ्या एका वनस्पतिशास्त्रज्ञानें भारतांत व नेपाळांत मिळून ५०,००० किलोमीटर प्रवास करून एक पुस्तक लिहिलें आहे. सदर पुस्तकाची पहिली आवृत्ति एका आठवड्यांतच संपली. रशिआंतील वनस्पति संशोधन संस्थसाठी त्यानें कांहीं उपयुक्त बीं-बियाणें बरोबर नेलीं आहेत.

### रूरकेला पोलाद कारखान्याचा विस्तार

रूरकेला येथील पोलादाच्या कारखान्याचा विस्तार करण्यासाठीं पश्चिम जर्मनीकडून ४८ कोटी रुपयांची मदत घेण्याचा करार करण्यांत आला आहे. ह्या कारखान्याची वार्षिक उत्पादन-क्षमता सध्यां १० लाख टनांची आहे. विस्ताराची योजना पूर्ण झाल्यावर दरसाल १८ लाख टन पोलाद निर्माण होऊं लागेल.


---

### साठे कंपनीची परदेशी हुंडणावळीची कमाई

मार्च, १९६३ अखेर संपलेल्या वर्षीं साठे बिस्किट अँड चॉकोलेट कं. लि. नें ऑस्ट्रेलिया आणि ग्रेट ब्रिटनकडे ३०·४३२ टन कोकोबटरची निर्गत केली आणि १२ टन बिस्किटें मध्य पूर्वेतील देशांकडे निर्गत केली. अशा रीतीनें २,०४,२६४ रु. ची परदेशी हुंडणावळ कमावली.


दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★



किर्लोस्कर

१" केन्ही टाइप

सेल्फ प्रायमिंग पंपिंग सेट

घरगुती उपयोगासाठीं तळ मजल्यावरुन वरच्या मजल्यावर पाणी नेण्यासाठीं किर्लोस्कर एक अिंचि पंप अत्यंत उपयुक्त व किफायतशीर आहेत. हे पंप दोन व तीन स्टेजमध्यें तयार केले जात असून त्यांस अनुक्रमे पाऊण व एक हॉ.पॉ.ची मोटर लागते. जास्तीतजास्त १०५ फूट उंचीवर या पंपाकडून १२० गॅलन्स पाणी दर तासास मिळू शकते.

किर्लोस्कर ब्रदर्स, लि. किर्लोस्करवाडी, जि. सांगली.

STUSA KM 2/62


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.